

| वर्ष - 8 | अंक - 66 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

गणपती बाप्पा मोरया



www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 12 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## ‘आरक्षणाला धक्का लावण्याचा प्रयत्न आम्ही हाणून पाडू’ : मुख्यमंत्री

# काँग्रेसचा आरक्षणविरोधी चेहरा उघड!

## » राहुल गांधींच्या वक्तव्यावरुन मुख्यमंत्री शिंदेंची टीका

**। मुंबई । महाईन्यूज**

**‘परदेशात जाऊन सातत्याने भारताची बदनामी करण्याचा उद्योग लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी करतात. परदेशात जाऊन मनाला येईल ते बरळणे, बेछूट आरोप करणे लोकप्रतिनिधीला शोभत नाही. मात्र, त्यांच्या वक्तव्याने काँग्रेसचा आरक्षणविरोधी खरा चेहरा उघड केला’, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी केली. भारत हा सामाजिकदृष्ट्या प्रगल्भ झाल्यानंतर देशातील आरक्षण संपविण्याचा विचार काँग्रेस पक्ष करेल, असे विधान राहुल गांधी यांनी अमेरिका दौऱ्यादरम्यान वॉशिंग्टनमधील जॉर्जटाऊन विद्यापीठातील विद्यार्थी आणि शिक्षकांशी संवाद साधताना केले. राहुल गांधी यांच्या या विधानावर शिंदे यांनी एक्स या समाजमाध्यमातून टीका केली. ‘आरक्षण संपवण्याचा मनसुबा राहुल गांधी यांनी अमेरिकेत व्यक्त केला आहे. आरक्षण संपवण्याची भाषा करणारे राहुल यांचे हे वक्तव्य अत्यंत दुर्दैवी आहे. शिवसेना आणि महायुतीतील सहकारी पक्ष आरक्षणाच्या बाजूने आहोत आणि आम्ही आरक्षण संपवू देणार नाही, याची ग्वाही पुन्हा यानिमित्ताने देत आहोत. आरक्षणाला धक्का लावण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही हाणून पाडू’, असा इशारा शिंदे यांनी दिला.**



### ‘भाजप आरक्षण बंद करु देणार नाही’

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राहुल गांधी यांच्या विधानाला प्रत्युत्तर दिले. ‘राहुल गांधी स्पष्टपणे आरक्षण संपविण्याबद्दल बोलले आहेत. एका बाजूला निवडणुकीत खोटे कथानक तयार करायचे आणि दुसरीकडे आरक्षण संपविण्याची गोष्ट करायची हे अतिशय चुकीचे आहे. भारताच्या संविधानाचा आणि संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा काँग्रेसने कधीच सन्मान केला नाही. काँग्रेसने बाबासाहेबांना लोकसभेवरही निवडून जाऊ दिले नाही. दोनवेळा षडयंत्र करून बाबासाहेबांना पराभूत करणारा हाच काँग्रेस पक्ष मतसांसाठी कशापद्धतीने खोटे कथानक तयार करतो, हे राहुल गांधींच्या विधानाने स्पष्ट झाले आहे. भाजप आरक्षणाच्या बाजूने असून आम्ही हे आरक्षण बंद करू देणार नाही’, असे फडणवीस यांनी सांगितले.

‘आपला भारत देश ही ‘फेअर प्लेस’ नाही, असे परदेशात जाऊन तिथल्या विद्यार्थ्यांसमोर बोलणे हे भारतातील नागरिकांसाठी अत्यंत अवमानकारक आहे. राहुल गांधी हे परकीय मानसिकतेलाच धार्जिणे आहेत, हे यानिमित्ताने सिद्ध होते. अनेक सर्वसामान्य भारतीय विद्यार्थ्यांनी जागतिक पातळीवर आपल्या बुद्धितेजाने लोकांची मने जिंकली आहेत. स्वामी विवेकानंदांपासून ते आजच्या आयटी क्षेत्रातील बुद्धिमंत विद्यार्थ्यांपर्यंत अनेकांनी अमेरिकेत भारताचा ध्वज उंचावला आहे. त्या सगळ्यांचा अवमान राहुल गांधी यांनी केला आहे. देशाचा, आमच्या अस्मितांचा आणि नागरिकांचा अपमान आम्ही कधीही सहन करणार नाही आणि मान्यही होणार नाही’, असे स्पष्ट करीत शिंदे यांनी राहुल गांधी यांच्या विधानाचा निषेध केला.

### राहुल गांधींना भाजपने घेरले

लोकसभा निवडणुकीत संविधान आणि आरक्षणावरुन राहुल गांधींनी धुवांधार प्रचार केला. मात्र आता अमेरिकेतल्या एका वक्तव्यानं सत्ताधाऱ्यांनी राहुल गांधी यांनी घेरलं आहे. भारतात पक्षपातीपणा थांबेल तेव्हा आरक्षण संपवण्याचा विचार करु, असं राहुल गांधी म्हणाले आहेत. अमेरिकेतून राहुल गांधींनी आरक्षणावरुन हे वक्तव्य दिलं. आणि सत्ताधाऱ्यांनी जोरदार घेरलं. भारतात पक्षपातीपणा थांबेल तेव्हा आरक्षण संपवण्याचा विचार करु, असं राहुल गांधी म्हणाले आहेत. केंद्र सरकारवर हल्लाबोल करताना, राहुल गांधींनी आरक्षणावरुन भाष्य केलं. पण त्याचवेळी पक्षपातीपणा थांबेल तेव्हा आरक्षण संपवण्याचा विचार केला जाईल हेही राहुल गांधी बोलले. विशेष म्हणजे, 4 महिन्यांआधी झालेल्या लोकसभा निवडणुकीत संविधानाची प्रत दाखवून राहुल गांधी, मोदींवर आरक्षण संपवतील असा आरोप करत होते. राहुल गांधींच्या या धुवांधार प्रचाराचा काँग्रेसला फायदाही झाला, पण आता आरक्षण संपवण्याच्या वक्तव्यावरुन आता राहुल गांधींवर शिंदे फडणवीसही तुटून पडले आहेत. आरक्षण विरोधी काँग्रेसचा चेहरा समोर आला असं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले आहेत. मतांसाठी आरक्षणावरुन कसा खोटा नॅरेटिव्ह केला हे राहुल गांधींच्या वक्तव्यातून दिसलं असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. राहुल गांधी यांनी वॉशिंग्टन डीसीमधून स्पष्टीकरण दिले आहे. राहुल गांधी म्हणाले की, माझे विधान चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आले आहे. काँग्रेस पक्ष आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडणार असल्याचे राहुल गांधी म्हणाले. ते म्हणाले की, मी आरक्षणाच्या विरोधात नाही. सर्वांच्या सहभागासाठी आम्ही राजकारण करत आहोत.

### राहुल गांधी कसे उत्तर देणार...

राहुल गांधी यांनी पीएम मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले की 2014 पासून भारताचे राजकीय चित्र बदलले आहे. राहुल गांधी म्हणाले की, 2014 पासून भारताने एका नव्या राजकीय युगात प्रवेश केला आहे. त्यांच्या मते हा टप्पा आक्रमकतेने आणि लोकशाही मूल्यांवर आघात करणारा आहे. राहुल गांधी यांनी ही लढत चुरशीची असल्याचेही म्हटले आहे.आपल्या देशात आरक्षण हा विषय फार संवेदनशील आहे. त्यामुळं जेव्हाही आरक्षणावरुन उलटसुलट प्रतिक्रिया येतात. तेव्हा त्या त्या पक्षांना आणि सरकारांना त्याचे परिणाम भोगावे लागलेले आहेत. आता, राहुल गांधींवरुन आयतीच संधी सत्ताधाऱ्यांनाच मिळाली आहे. त्यामुळे राहुल गांधी याला आता कसे उत्तर देतात हे पाहावे लागेल.

# ‘लेझर झोतां’वर अखेर दंडुका!

## मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या तीन मंडळांविरुद्ध कारवाई

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गणेशोत्सवात घातक लेझर झोतांचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली असतानाही दहीहंडी आणि गणेश प्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत लेझर दिव्यांचा वापर करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली आहे.**



लेझर झोतांसाठी साहित्य पुरविणाऱ्या सहा जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या गणेश मंडळांविरुद्ध कारवाईचा बडगा पोलिसांनी उगारला असून, आतापर्यंत तीन मंडळांवर गुन्हे दाखल झाले आहेत. लेझर प्रकाशझोतांचा वापर केल्याप्रकरणी प्रभाकर पवार, हर्षद भालसिंग (३५), राकेश चौधरी (३२), गणेश यादव (३०, रा. फुरसुंगी), अजिंक्य ढमाळ (३३, भेकराईनगर), मनोज जगताप (३८, रा. धमाळवाडी), महादेव खापणे (३३, रा. कोल्हापूर), रोशन पाटील (रा. ससाणेनगर), आशिष चव्हाण (रा. हडपसर), अनिकेत जगताप (रा. ससाणेनगर), मोहंमद आशिक (रा. केरळ) यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. त्यांच्याकडून लेझर झोत (बीम लाइट), ध्वनिवर्धक यंत्रणा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला, अशी माहिती हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे यांनी दिली.दहीहंडी, तसेच गणेशोत्सवात लेझर झोतांचा वापर केल्यास कारवाई करण्याचा आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला होता. दहीहंडीत लेझर झोतांचा वापर मंडळांकडून करण्यात आला होता. शनिवारी (७ सप्टेंबर) प्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त विविध मंडळांकडून मिरवणुका काढण्यात आल्या. मिरवणुकीत ध्वनिवर्धक यंत्रणा, तसेच लेझर झोतांचा वापर करण्यात आल्याचे उघडकीस आले होते. त्यानंतर पोलिसांनी गुन्हे दाखल केले.गणेशोत्सवात आवाज मर्यादेचे उल्लंघन केल्याप्रकरणी मुंढव्यातील तीन मंडळांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेशोत्सवात अनेक मंडळांकडून उच्च क्षमतेच्या ध्वनिवर्धक यंत्रणेचा (साउंड सिस्टीम) वापर केला जातो. आवाजाची मर्यादा ओलांडल्याप्रकरणी पोलिसांकडून गुन्हे दाखल करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.विसर्जन मिरवणुकीत लेझर झोतांचा वापर, तसेच उच्च क्षमतेची ध्वनिवर्धक यंत्रणा वापरल्यास कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. विसर्जन मिरवणुकीत पोलिसांकडून नेमकी काय करवाई करण्यात येणार आहे, याकडे सामान्यांचे लक्ष लागून राहिले आहे. लोहगाव परिसरात हवाई दलाचा तळ, तसेच नागरी विमानतळ आहे. लेझर झोतांमुळे वैमानिकांचे डोळे दिपून अपघात होण्याची शक्यता असल्याने पुढील साठ दिवस लेझर झोतांवर बंदीचा आदेश सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिला आहे.लेझर झोतांसाठी साहित्य पुरविणाऱ्या सहा जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या गणेश मंडळांविरुद्ध कारवाईचा बडगा पोलिसांनी उगारला असून, आतापर्यंत तीन मंडळांवर गुन्हे दाखल झाले आहेत.

### मंडळांविरुद्ध कारवाईला सुरुवात

लेझर प्रकाशझोतांचा वापर केल्याप्रकरणी प्रभाकर पवार, हर्षद भालसिंग (३५), राकेश चौधरी (३२), गणेश यादव (३०, रा. फुरसुंगी), अजिंक्य ढमाळ (३३, भेकराईनगर), मनोज जगताप (३८, रा. धमाळवाडी), महादेव खापणे (३३, रा. कोल्हापूर), रोशन पाटील (रा. ससाणेनगर), आशिष चव्हाण (रा. हडपसर), अनिकेत जगताप (रा. ससाणेनगर), मोहंमद आशिक (रा. केरळ) यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. त्यांच्याकडून लेझर झोत (बीम लाइट), ध्वनिवर्धक यंत्रणा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला, अशी माहिती हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे यांनी दिली.

# राज्यातील १३५ गोशाळांना झाली मोठी मदत

## राज्यातील 135 गोशाळांना 17 कोटी 21 लाख रुपये अनुदान

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेअंतर्गत सन २०२३ -२४ मध्ये ३४ जिल्ह्यांतील ३२४ तालुक्यांतील पात्र १३५ गोशाळांना १७ कोटी २१ लाख रुपये अनुदान स्वरूपात वितरित करण्यात आले आहेत.**



महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, अशासकीय सदस्य डॉ. सुनील सूर्यवंशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, आयोगामार्फत राबविण्यात आलेल्या गोवर्धन गोवंश सेवा केंद्रामधील पशुधनासाठी आवश्यक असलेल्या वैरणीसाठी वैरण उत्पादन कार्यक्रम सुरू आहे. देशी गोवंशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने आयोगाची स्थापना केली होती. गोशाळांनी दुग्धोत्पादनास, शेती कामास, पशुपैदाशीस, ओझी वाहण्याच्या कामास उपयुक्त असलेल्या-नसलेल्या गाय, वळू व बैल व वय झालेल्या गोवंशाचे संगोपन करण्याकरिता चारा, पाणी व निवाऱ्यांची सोय करण्यासाठी हे अनुदान वितरित करण्यात आले आहे. मागील एका वर्षापासून गोशाळाचालकांना या अनुदानाची प्रतीक्षा होती. राज्यात १९९५ साली युती सरकारने केलेल्या महाराष्ट्र प्राणी त्यानुसार गायींच्या कत्तलीवर बंदी होती. ४ मार्च २०१५ साली या कायद्यात सुधारणा करून राज्यात संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायदा लागू केला. त्यानुसार शेतीकामांसाठी, ओझी वाहण्यासाठी व पैदाशीसाठी उपयुक्त नसलेला गोवंश म्हणजे बैल, वळू, यांच्या कत्तलीवरही बंदी घालण्यात आली.

### वैरण उत्पादन कार्यक्रम सुरू

त्याचा परिणाम म्हणून राज्यात शेती, पैदास आणि दूधासाठी अनुत्पादक असलेल्या गोवंशीय पशुधनाच्या संख्येत वाढ होणार आहे. अशा अनुत्पादक गोवंशांचा सांभाळ, संगोपन करण्यासाठी २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही योजना सुरू करण्यात आली होती.गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेअंतर्गत सन २०२३ -२४ मध्ये ३४ जिल्ह्यांतील ३२४ तालुक्यांतील पात्र १३५ गोशाळांना १७ कोटी २१ लाख रुपये अनुदान स्वरूपात वितरित करण्यात आले आहेत.सुनील सूर्यवंशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, आयोगामार्फत राबविण्यात आलेल्या गोवर्धन गोवंश सेवा केंद्रामधील पशुधनासाठी आवश्यक असलेल्या वैरणीसाठी वैरण उत्पादन कार्यक्रम सुरू आहे.

## राजकीय बांधकाम व्यावसायिकांच्या दुटप्पीपणामुळेच

# सोसायटीधारकांवर "पाणी संकट"!

### आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पावरून महाविकास आघाडीतील इच्छुक नेत्यांकडून होणारा आरोप धांदात खोटा

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील सोसायटीधारकांना भेडसावणारा पाणी प्रश्न हा शहरातील राजकीय पटलावरील कळीचा मुद्दा ठरला आहे. राजकीय बांधकाम व्यावसायिकांच्या मनमानीमुळे सोसायटीधारक त्रस्त असून, आता आगामी निवडणुकीत त्याचा राजकीय फायदा घेण्याची चढाओढ सध्या पहायला मिळत आहे. "आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पातून पाणी पुरवठा सुरू होत नाही. तोपर्यंत संबंधित गृहप्रकल्पामध्ये पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी बांधकाम व्यावसायिकाची राहील" असा करारनामा केलेला असतानासुद्धा चऱ्होली आणि परिसरातील सोसायटींमध्ये पाणी समस्या दिसून येते. याला जबाबदार कोण? असा प्रश्न पिंपरी-चिंचवडकरांना पडला असेल. कारण, विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेले एक अभ्यासू नेते सोशल मीडियावर पाणी पुरवठ्यावरुन राजकीय "FAKE NARRATIVE" करण्याचा प्रयत्न करीत आहेत.**




आंद्रा-भामा प्रकल्पाचे पाणी शहरात दाखल होईपर्यंत बांधकाम व्यावसायिकाने पाणी पुरवठा करणे बंधनकारक असताना बांधकाम व्यावसायिक सदनिकाधारकांसोबत ॲग्रीमेंट करताना "पाण्याचा खर्च सदनिकाधारक करतील" अशी मेक मारुन ठेवतात आणि इथेच सदनिकाधारक फसतात. याबाबत सोसायटी फेडरेशनने आवाज उठवला होता. किंबहूना, "महानगरपालिकेसोबत केलेल्या कराराप्रमाणे बांधकाम व्यावसायिकाने सोसायटीला पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी घ्यावी" याबाबत आमदार महेश लांडगे यांनी राज्याच्या विधानसभा सभागृहात बाजू मांडली होती. त्यामुळेच "रेरा" कायद्यामध्ये गृहप्रकल्पांच्या पाणीपुरवठ्याचा मुद्दा समाविष्ट करण्याबाबत राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घेतली. शहरात सोसायटी फेडरेशन आणि आमदार महेश लांडगे यांनी पाणी पुरवठ्या मुद्दा लावून धरल्यामुळे चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरीडॉरसाठी संजीवनी असलेला आंद्रा भामा आसखेड प्रकल्पातील पहिला टप्पा पूर्ण झाला. १०० एमएलडी पाणी चिखली जलशुद्धीकरण केंद्रामध्ये दाखल झाले. या प्रकल्पातून तळवडे, चिखली, जाधववाडी, मोशी, बोऱ्हाडेवाडी, चऱ्होली, डुडूळगाव या भागात पाणीपुरवठा केला जात आहे.

असे असले तरी, सोसायटीधारकांची वाढलेली संख्या आणि उपलब्ध होणारे पाणी याचे प्रमाण व्यस्त आहे. परिणामी, अनेक सोसायट्यांमध्ये टँकर मागवावे लागतात. या पाणी प्रश्नावरुन राजकीय पोळी भाजण्यासाठी महाविकास आघाडीचे इच्छुक उमेदवार सध्या सोसायट्यांमध्ये भेट देत आहेत आणि "पाणी पुरवठ्याची जबाबदारी महानगरपालिका आणि सत्ताधारी आमदारांची आहे" असा NARRATIVE करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

वास्तविक, महाविकास आघाडीची सत्ता असताना संबंधित नेत्यांनी आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पाला गती दिली असती, तर कदाचित आंद्राचे १०० एमएलडी पाणी दोन- अडीच वर्षे लवकर शहरात दाखल झाले असते. तसेच, भामा आसखेड प्रकल्पाचे कामही पूर्ण झाले असते. मात्र, संधी असतानाही काहीही 'रिझल्ट' न दाखवता, स्वत: काय केले? याचे आत्मचिंतन न करता सोसायटीधारकांच्या मतांची गोळाबेरीज करण्यासाठी निराधार आक्षेप घेतला जातो आहे. त्यामुळे निवडणुकीच्या निमित्ताने सोसायटीधारक दिशाभूल करणाऱ्या नेत्यांना साथ देतात की, प्रत्यक्षात पाणी पुरवठ्यासाठी प्रामाणिक काम करणाऱ्यांना ताकद देतात...? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

#### इच्छुकांचे बिल्डरधार्जिणे धोरण... सोसायटीधारकांच्या मुळावर..!

आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडीतून इच्छुक असलेल्या एका नेत्याने चऱ्होली, मोशी, चिखली या भागामध्ये अनेक गृहप्रकल्प उभारले आहेत. आपण महानगरपालिका प्रशासनासोबत केलेला करार काय सांगतो? याचा अभ्यास न करता स्वत: उभारलेल्या प्रकल्पातील सदनिकाधारकांची फसवणूक करायची आणि अन्य सोसायटीधारकांची दिशाभूल करायची, याहून पुढे सोसायटीधारकांची बाजू घ्यायचे सोडून, स्वत:ची राजकीय पोळी भाजण्यासाठी बिल्डर किंवा डेव्हलपर यांची जबाबदारी महानगरपालिका प्रशासन व सत्ताधारी नेत्यांच्या गळ्यात मारत आहेत. अशाप्रकारे इच्छुकांचे बिल्डरधार्जिणे धोरण शहरातील सोसायटीधारकांच्या मुळावर उठले आहे, अशी खंत पिंपरी-चिंचवडकरांमध्ये बोलून दाखवली जात आहे.

---

## चऱ्होलीतील भाजी मंडईच्या कामाला 'चालना'!

### भाजपा आमदार महेश लांडगे यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**झपाट्याने विस्तारलेल्या चऱ्होली परिसरातील म्हसोबा चौकातील भाजी मंडईचा प्रश्न अखेर सुटणार आहे. भाजी विक्रेत्यांची अडचण सोडविण्यासाठी मंडईतील स्वच्छतागृहासह उर्वरित कामे तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश आमदार महेश लांडगे यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिले. भाजी मंडईसाठी सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.**



महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर समाविष्ट भागातील विकास कामांना चालना मिळाली. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्हिजन 20-20 च्या माध्यमातून समाविष्ट गावांचा विकास करण्यावर भर दिला. पाणीपुरवठ्यासह सर्व सोयी सुविधा सक्षमपणे उपलब्ध झाल्या. परिणामी, या भाग झपाट्याने विस्तारला. मोठ मोठ्या गृहनिर्माण संस्था झाल्या. त्यामुळे या परिसरातील लोकसंख्येत मोठी वाढ झाली. वाढत्या नागरिकांसाठी भाजीपाला खरेदी करण्याकरिता च-होली बुद्रूक परिसरातील म्हसोबा चौकामध्ये भाजी मंडई उभारण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर यांनी महापालिका प्रशासन आणि आमदार महेश लांडगे यांच्याकडे केली होती. त्यानुसार भाजी मंडईचे काम हाती घेण्यात आले. मंडईचे बहुतांश काम पूर्ण झाले आहे. परंतु, स्वच्छतागृहाची सुविधा नव्हती. यासह किरकोळ कामे शिल्लक होती. यामुळे भाजी विक्रेत्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. याची दखल घेत आमदार लांडगे यांनी जागेवर जाऊन कामाची पाहणी केली. अधिकाऱ्यांना बोलावून घेत तत्काळ काम पूर्ण करण्याचे आदेश दिले.

> "च-होली परिसर झपाट्याने विस्तारला आहे. या भागातील नागरिकांची भाजी मंडईची मागणी होती. त्यानुसार आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून मंडईचे काम पूर्णत्वास आले. लवकरच मंडई सुरू केली जाईल. त्यामुळे नागरिक आणि भाजी विक्रेत्यांची अडचण दूर होणार आहे.
>
> **–सचिन तापकीर,** सामाजिक कार्यकर्ते, चऱ्होली.

# जातीनिहाय जनगणनेचे भय कशाला?




**गेल्या काही वर्षांपासून जातीनिहाय जनगणना या विषयावर देशभर प्रचंड कोलाहल माजलेला दिसत आहे आणि त्याभोवती देशाचे संपूर्ण राजकारण फिरताना दिसते. परंतु, जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा वाटतो तेवढा खरोखरच भयावह आहे का, यावर विचार केला पाहिजे.**

जनगणनेत प्रत्येक नागरिकाच्या अनेक बाबी नोंदविलेल्या असतात. उदा. त्या व्यक्तीचा धर्म, व्यवसाय, लिंग, वय, मातृभाषा, शिक्षण, इत्यादि. आपल्या देशातील हिंदू नागरिकांची अजून एक विशेष ओळख आहे, ती म्हणजे जात. इंग्रजांनी त्यांच्या कार्यकाळात देशात जनगणना सुरू केल्यावर प्रत्येक नागरिकाच्या जातीची सुद्धा नोंद करून जातीनिहाय जनगणना करण्यास सुरुवात केली. इंग्रजांनी शेवटची जातीनिहाय जनगणना १९३१ साली केली. स्वातंत्र्यानंतर, अनसूचित जाती जमाती (अ.जा./अ.ज.) वगळता, जातीनिहाय जनगणना केली गेली नाही. म्हणजे आपली जनगणना ही अंशतः का होईना, जातीनिहाय होत आहे.मग, गेल्या काही वर्षांत हा जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा का समोर आला? याचे मूळ शोधल्यास लक्षात येईल की ओबीसी जातींच्या आरक्षणासंदर्भात ही मागणी पुढे आली होती. १९९० साली २७ टक्के ओबीसी आरक्षण लागू



झाले. सामाजिक आधारावरील आरक्षण हे त्या समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात दिले जाते. आरक्षणावरील ५० टक्क्यांच्या मर्यादेमुळे लोकसंख्या ५२ टक्के असूनही फक्त २७ टक्केच आरक्षण ओबीसींना मिळाले. त्यासाठी १९३१ सालच्या जनगणनेचा आधार घ्यावा लागला. ही आकडेवारी अद्ययावत स्वरूपात उपलब्ध व्हावी हा या जनगणनेच्या मागणीचा उद्देश असू शकतो.जातीनिहाय जनगणनेस भाजपचा मात्र विरोध आहे. यामुळे देशाचे विभाजन होईल, ही मागणी माओवादाशी जवळीक साधणारी आहे अशी बिनबुडाची कारणे भाजपने दिली. परंतु, बिहार राज्यात मात्र तोच पक्ष अशा जनगणनेस पाठिंबा देतो. सध्याची धर्मनिहाय आणि अंशतः जातीनिहाय जनगणना भाजपला चालते. मग सर्वच जातींची नोंदणी होऊन, जातीजातींची अधिकृत आणि शास्त्रीय स्वरूपात सांख्यिकीय माहिती उपलब्ध होत असल्यास त्यास भाजपचा आक्षेप का? अशी जनगणना झाल्यास, जातींचे काल्पनिक आकडे वापरून केल्या जाणाऱ्या सवलतींच्या मागण्यांवर मर्यादा तरी येतील. परंतु भाजपची अडचण ही आहे की ओबीसी लोकसंख्येची अद्ययावत माहिती उपलब्ध झाल्यास त्या प्रमाणात आरक्षण मिळावे म्हणून सरकारवर ओबीसी वर्गाकडून दबाव टाकला जाईल, ओबीसी मतांवर राजकारण खेळले जाईल आणि त्यामुळे भाजपचा हिंदुत्वाचा धार्मिक अजेंडा निष्प्रभ होईल. जातीनिहाय जनगणनेतून काय साध्य होणार आहे याची झलक बिहार राज्यात मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राज्य भाजपच्या पाठिंब्याने केलेल्या जातीनिहाय सर्वेक्षणानंतर दिसून आली. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा आड आल्याने ओबीसींच्या हाती आपल्या लोकसंख्येचा ताजा आकडा कळण्यापलीकडे अद्याप काहीही लागलेले नाही. आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही जातीनिहाय जनगणनेला आपण अनुकूल असल्याचे थेट जाहीर करून भाजपची डोकेदुखी वाढवली आहे. अर्थात या जनगणनेचा उपयोग राजकारणासाठी करू नये असा मानभावी सल्ला देण्यास संघ प्रवक्ते विसरले नाहीत. संघ कुटुंबातील भाजपनेच धार्मिक आधारावरील जनगणनेचा मनसोक्त उपयोग करून घेऊन, हिंदुत्वाच्या नावाने राजकारण केले आणि सत्ता मिळवली. त्याकडे कानाडोळा करून जनगणनेचे राजकारण करू नका असा सल्ला संघाने देणे, हा केवढा मोठा विरोधाभास आहे!काँग्रेसचे नेते राहूल गांधी यांनी तर जातीनिहाय जनगणनेचा धोशाच लावलेला दिसत आहे. त्या मागे इतर पक्षांप्रमाणे ओबीसी मतांवर त्यांचाही डोळा आहे हे स्पष्ट आहे आणि ते साहजिकही आहे. स्वातंत्र्यानंतर जवळपास चार-पाच दशके काँग्रेसचे किंवा त्यांच्या आघाडीचे राज्य होते. तेव्हा जातीनिहाय जनगणना का केली नाही असा प्रश्न साहजिकच उद्भवतो. परंतु, मुळात ओबीसी आरक्षण हेच १९९० साली आले.

## प्रासंगिक »

### विजेला धक्का

***केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विजेवर चालणाऱ्या वाहनांना दिल्या जाणाऱ्या सवलती बंदच करण्याची जाहीर सूचना केली, ती स्वागतार्हच...***

विजेवर चालणाऱ्या मोटारींवर दिलेल्या सवलतींबाबत वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या मताशी कोणीही शहाणे सहमत होतील. विद्यामान केंद्र सरकारात असूनही नितीनभाऊंची मते नेहमीच वास्तवाच्या जवळ जाणारी असतात आणि मुख्य म्हणजे ती व्यक्त करण्यात ते कचरत नाहीत. मग ती बाब सद्या:स्थितीतील सत्ताकारणाची असो वा वैद्याकीय विम्यावर अवाच्या सवा कर आकारणीबाबतची असो. नितीनभाऊ उगाच कोणास काय वाटेल याची तमा बाळगत गप्प राहात नाहीत. दणकून बोलतात. आताही त्यांनी विजेवर चालणाऱ्या मोटारींस दिल्या जाणाऱ्या सवलतींबाबत असेच भाष्य केले. निमित्त होते जागतिक वीज मोटार दिनाचे. राहणार असा प्रश्न उपस्थित केला. तो अत्यंत रास्त आहे. याचे साधे अर्थशास्त्रीय कारण असे की हे असे सवलतींच्या जोरावर विस्तारणारे क्षेत्र सवलती काढून घेतल्यावर आक्रसते.

साने गुरुजींनी अनेक धडपडणारी मुले घडवली, मानवतेचा सर्वत्र प्रसार केला आणि आंतरभारतीच्या माध्यमातून विविध भाषकांना जोडण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या या कार्याचा वसा घेतलेले कार्यकर्ते आपापल्या परीने त्यांचे काम पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहेत.

# वसा साने गुरुजींच्या विचारांच्या प्रसाराचा

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक' उभे राहिले असून नवीन पिढी घडवण्याचे काम पोटतिडकीने केले जात आहे. ने गुरुजींचा मानवतेचा मंत्र आणि आंतरभारतीची संकल्पना यांचा प्रसार करण्याचे काम राष्ट्र सेवा दल आणि साधना प्रकाशनाकडून केला जात आहे. त्या कार्याला गती देण्यासाठी राजगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात वडघर येथे 'साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक' गेल्या २५ वर्षांपासून काम करत आहे. मुख्यत: युवकांना घडवण्याचे, त्यांच्यामध्ये आधुनिक मूल्ये बिंबवण्याचे काम अव्याहतपणे सुरू आहे. युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये स्वभान ते समाजभान निर्माण करण्याचे कार्य या स्मारकाच्या माध्यमातून केले जात आहे. त्याशिवाय आंतरभारतीचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून विविध भाषांमधील साहित्यांचा अनुवाद करून देशविदेशांतील वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून केले जात आहे.स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र तसेच गुजरात, कर्नाटक यांसारख्या



राज्यांमध्ये अनेक मेळावे घेतले गेले. सर्व भाषांतील साहित्याच्या प्रकाशनासाठी तसेच लेखक, कवी, विचारवंतांना एक व्यासपीठ मिळावे म्हणून साहित्य अकादमीसारखी स्वायत्त संस्थाही पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळात उभी केली. पण साने गुरुजींची ही संकल्पना महाराष्ट्र सरकार किंवा खासगी संस्था व्याख्याने आणि मेळाव्यांपलीकडे नेऊ शकल्या नाहीत. ही कमतरता भरून काढण्यासाठी वडघर येथे 'साने गुरुजी राष्ट्रीय सामारका'ची मुहूर्तमेढ रोवली गेली. साने गुरुजींच्या जन्मशताब्दी वर्षात म्हणजे १९९९ साली गुरुजींच्या साहित्य आणि विचारांवर प्रेम करणारे प्रकाशभाई मोहाडीकर, गजानन खातू, यशवंत क्षीरसागर, साने गुरुंजीच्या पुतणी सुधाताई बोडा, तुलसी बोडा, ज्येष्ठ कवी अर्जुन डांगळे, सुधीर देसाई, उमेश कदम यांच्यासारके कार्यकर्ते मधुकरराव चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली एकत्र आले. त्या वेळी पालगड येथील साने गुरुजींच्या वास्तूचे स्मृतिभवन करण्याचा ठराव मांडला गेला. पण गजानन खातू यांना साने गुरुजींच्या नावाने राष्ट्रीय पातळीवरचे काम व्हावे असे वाटत होते. त्यासाठी जागा शोधणे, निधी उभा करणे अशा कामांसाठी अमोल पालेकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्मारक समिती स्थापन करून युवा शिबीर, अभिवादन यात्रासारखे उपक्रम सुरू करण्यात आले.कविवर्य कुसुमाग्रज, मृणालताई गोरे, भाई वैद्या, पन्नालाल सुराणा यांच्यासारख्याउपक्रमात हळूहळू अनेक संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते सहभागी झाले. पुढे मुंबईमधील शाळेतील विद्यार्थ्यांनी दिलेल्या एक-एक रुपयाच्या देणगीतून उभ्या राहिलेल्या पैशांमधून माणगावजवळील वडघर येथे ३६ एकर जमीन विकत घेतली गेली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक ः MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक ः वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक ः सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बावनकुळेला प्रत्यक्षदर्शींनी चोप दिला

## सुषमा अंधारेंनी केले अनेक धक्कादायक आरोप



। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नागपूरमध्ये घडलेल्या हिट अँड रन प्रकरणात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाचे नाव घेतले गेल्यामुळे हे प्रकरण सध्या राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे. रविवारी (दि. ८ सप्टेंबर) मध्यरात्रीनंतर अनेक वाहनांना धडक देणाऱ्या ऑडी कारमध्ये भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे चालकाच्या शेजारी बसून होता, असे पोलीस उपायुक्त राहुल मदने यांनी प्रसारमाध्यमांना सांगितल्यानंतर याविषयी अनेक नवनवीन खुलासे समोर येत आहेत.**

नागपूरमध्ये घडलेल्या हिट अँड रन प्रकरणात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाचे नाव घेतले गेल्यामुळे हे प्रकरण सध्या राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे. रविवारी (दि. ८ सप्टेंबर) मध्यरात्रीनंतर अनेक वाहनांना धडक देणाऱ्या ऑडी कारमध्ये भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे चालकाच्या शेजारी बसून होता, असे पोलीस उपायुक्त राहुल मदने यांनी प्रसारमाध्यमांना सांगितल्यानंतर याविषयी अनेक नवनवीन खुलासे समोर येत आहेत. रविवारी मध्यरात्री मानकापूर मार्गे कोराडीला जात असताना वाटेत का वाहनांना संकेत बावनकुळे बसलेल्या कारने धडक दिली. यावेळी प्रत्यक्षदर्शींनी संकेत बावनकुळे आणि इतरांना पकडून चोप दिला, असा दावा सुषमा अंधारे यांनी केला. प्रत्यक्षदर्शींनी चोप दिल्यानंतर आरोपींना पोलीस ठाण्यात आणण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र त्यातून वाचण्यासाठी संकेत बावनकुळे वाहनासह पळून गेला. त्यामुळे रामदास पेठेत आणखी तीन वाहनांना धडक दिली गेली. या तीन वाहनांपैकी एक वाहन नागपूर प्रेस क्लबचे कर्मचारी जितेंद्र सोनकांबळे यांची होती. जितेंद्र सोनकांबळे यांनी रात्रीच एफआयआर दाखल करण्याचा प्रयत्न केला, पण पोलिसांनी तक्रार घेतली नाही, असा आरोप सुषमा अंधारे यांनी केला.रविवारी (दि. ८ सप्टेंबर) मध्यरात्री संकेत बावनकुळे आणि त्याचे दोन मित्र अर्जून जितेंद्र हावरे (२४) आणि रोनित चिंतमवार (२७) धरमपेठमधील लाहोरी हॉटेलमध्ये गेले होते. मध्यरात्री साडेबाराला ते ऑडी मोटारीतून बाहेर पडले. सेंट्रल बाजार रोडवरुन भरधाव जात असताना सेंटर पॉईंट हॉटेलसमोर त्यांनी जितेंद्र सोनकांबळे याच्या मोटारीसह तीन वाहनांना धडक दिली. अपघात झाला त्यावेळी संकेत दोन्ही मित्रांसह कारमध्येच होता. मात्र, सीताबर्डी पोलिसांनी अर्जुन हावरे आणि रोनित चिंतमवार यांनाच ताब्यात घेतले होते. संकेतचे नाव एफआयआरमध्ये नव्हते.सीताबर्डी पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांकडून माहिती घेतल्यानंतर सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्या म्हणाल्या की, हिट अँड रन प्रकरणाची तक्रार दाखल करणाऱ्या फिर्यादीवर प्रचंड दबाव आहे. जितेंद्र सोनकांबळे हे अनुसूचित जातीचे असून त्यांच्यावर प्रचंड दबाव आहे. मला त्यांच्या जीवाची जास्त काळजी वाटते. सोनकांबळे यांना पोलीस संरक्षण दिले गेले पाहीजे, अशी आमची मागणी आहे, असेही त्या म्हणाल्या.संकेत बावनकुळे आणि त्याच्या मित्रांनी लाहोरी बारमध्ये बीफ कटलेट खाल्ले असा आरोप सुषमा अंधारे आणि संजय राऊत यांनी केला. त्यावरून संजय राऊत यांनी म्हटले की, "संकेत बावनकुळे यांच्या गाडीमध्ये एका लाहोरी बारचं बिल मिळून आलं. त्यामध्ये संकेत बावनकुळे यांच्या खाण्या-पिण्याचा उल्लेख आहे. या बिलावर दारू, चिकन, मटणासह बीफ कटलेटचाही समावेश आहे. मग हिंदूत्व शिकवणाऱ्या लोकांनी बीफ कटलेट खाल्ले आहे. मग भाजप हिंदूत्व शिकवणार का?", असा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाचे नाव घेतले गेल्यामुळे हे प्रकरण सध्या राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे. रविवारी (दि. ८ सप्टेंबर) मध्यरात्रीनंतर अनेक वाहनांना धडक देणाऱ्या ऑडी कारमध्ये भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे चालकाच्या शेजारी बसून होता.

### बावनकुळे वाहनासह पळून गेला

असे पोलीस उपायुक्त राहुल मदने यांनी प्रसारमाध्यमांना सांगितल्यानंतर याविषयी अनेक नवनवीन खुलासे समोर येत आहेत. रविवारी मध्यरात्री मानकापूर मार्गे कोराडीला जात असताना वाटेत का वाहनांना संकेत बावनकुळे बसलेल्या कारने धडक दिली. प्रत्यक्षदर्शींनी चोप दिल्यानंतर आरोपींना पोलीस ठाण्यात आणण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र त्यातून वाचण्यासाठी संकेत बावनकुळे वाहनासह पळून गेला.

# 'लाडकी बहीण' योजनेमुळे अनुदानाला कात्री

## सांगली पालिकेच्या वार्षिक अनुदानात 66 कोटींची घट

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शासनाने लाडकी बहीण योजना लागू केल्यानंतर महापालिकेला देण्यात येत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिपूर्ती अनुदान आणि पंधराव्या वित्त आयोगातील अनुदानाला कात्री लावली आहे. यामुळे महापालिकेला वार्षिक ६६ कोटींच्या अनुदानात घट झाली असून याचा विकासकामावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

शासनाने एलबीटी म्हणजेच स्थानिक संस्था कर हटविल्यानंतर या बदल्यात महापालिकेला अनुदान दिले जाते. यानुसार सांगली महापालिकेला शासनाकडून मिळणाऱ्या एलबीटी अनुदानात २० टक्के कपात केली आहे. यामुळे मासिक ३ कोटींच्या अनुदानाला मुकावे लागणार आहे. तसेच या महिन्यापासून चौदाव्या वित्त आयोगानुसार मिळणाऱ्या अनुदानातही सुमारे ६० टक्के कपात करण्यात आली असून यामुळे वार्षिक ३० कोटींचे अनुदान रोखले जाणार आहे. एलबीटी प्रतिपूर्ती अनुदानात २० आणि वित्त आयोगाच्या अनुदानात ६० टक्के शासनाने कपात केल्याने महापालिकेला मिळू शकणारे सुमारे ६६ कोटींचे अनुदान थांबणार आहे. या अनुदानातून महापालिका कर्मचाऱ्यांचे वेतन वेळच्यावेळी होत होते. आता वेतनासाठी अन्य पर्याय शोधावे लागणार आहेत. तसेच विकासकामासाठी निधीची चणचण भासणार असल्याचे महापालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न देण्याच्या अटीवर सांगितले. शासनाने लाडकी बहीण योजना लागू केल्यानंतर महापालिकेला देण्यात येत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिपूर्ती अनुदान आणि पंधराव्या वित्त आयोगातील अनुदानाला कात्री लावली आहे. यानुसार सांगली महापालिकेला शासनाकडून मिळणाऱ्या एलबीटी अनुदानात २० टक्के कपात केली आहे. यामुळे मासिक ३ कोटींच्या अनुदानाला मुकावे




### सुमारे 66 कोटींचे अनुदान थांबणार

अनुदानातही सुमारे ६० टक्के कपात करण्यात आली असून यामुळे वार्षिक ३० कोटींचे अनुदान रोखले जाणार आहे.एलबीटी प्रतिपूर्ती अनुदानात २० आणि वित्त आयोगाच्या अनुदानात ६० टक्के शासनाने कपात केल्याने महापालिकेला मिळू शकणारे सुमारे ६६ कोटींचे अनुदान थांबणार आहे. या अनुदानातून महापालिका कर्मचाऱ्यांचे वेतन वेळच्यावेळी होत होते. आता वेतनासाठी अन्य पर्याय शोधावे लागणार आहेत. तसेच विकासकामासाठी निधीची चणचण भासणार असल्याचे महापालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न देण्याच्या अटीवर सांगितले.

# भाजपाच्या गोटात भितीचे वातावरण!

## खर्गे यांची भारतीय जनता पार्टीवर सडकून टीका

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे सध्या जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर आहेत. दरम्यान, त्यांनी आज (११ सप्टेंबर) अनंतनाग येथे आयोजित प्रचारसभेत बोलताना भारतीय जनता पार्टीवर सडकून टीका केली. ते म्हणाले, "लोकसभेला आमच्या अजून २० जागा आल्या असत्या तर हे सगळे तुरुंगात असते (आमचे अजून २० उमेदवार निवडून आले असते तर भाजपावाले तुरुंगात असते). ४०० पारच्या घोषणा देणारे लोक अवघ्या २४० जागांवर अडकले. मात्र आमच्या अजून थोड्या जागा यायला हव्या होत्या. तसं झालं असतं तर आताची राजकीय समीकरणं वेगळी असती".**



खर्गे म्हणाले, "आम्ही अजून २० जागा जिंकल्या असत्या तर हे सगळे लोक आज तुरुंगात असते. ते लोक केवळ तुरुंगात राहण्यालायक आहेत. भारतीय जनता पार्टीचे लोक केवळ मोठमोठी भाषणं करतात, पण त्याच भाषणांमध्ये दिलेली आश्वासनं पूर्ण करणं त्यांना जमत नाही. भाषण करणं आणि कृती करणं यात खूप फरक आहे. भाजपाने कितीही प्रयत्न केले तरी कॉंग्रेस व नॅशनल कॉन्फरन्सची युती त्यांना तोडता येणार नाही. आम्ही व आमची युती कमजोर होणार नाही. संसदेत आम्ही आमची ताकद दाखवून दिली आहे. आता विधानसभेत त्यांना इंगा दाखवायची वेळ आली आहे. आमची एकजूट झाली आहे, पर्ण ताकदीनिशी आम्ही जम्मू काश्मीरच्या विधानसभेत परतू.मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले, कॉंग्रेस व नॅशनल कॉन्फरन्सची युती पाहून भारतीय जनता पार्टी घाबरली आहे. त्यामुळेच ते जम्मू-काश्मीरमधील उमेदवारांची यादी वारंवार बदलत आहेत. कोणत्या जागेवर कुठला उमेदवार उभा करावा हे त्यांना सुचेनासं झालं आहे. त्यांचा पक्ष या राज्यात कमकुवत आहे. भाजपाच्या गोटातील बातम्या वाचून तुम्हाला अंदाज आलाच असेल की इंडिया आघाडीची एकजूट पाहून हे भाजपावाले किती घाबरले आहेत. राहुल गांधी व फारुख अब्दुल्ला एकत्र आल्याने भाजपाच्या गोटात शांतता पसरली आहे.भाजपाने जम्मू-काश्मीरमध्ये ५ लाख नोकऱ्या निर्माण करण्याचं आश्वासन दिलं होतं. खर्गे यांनी याला भाजपाची जुमलेबाजी म्हटलं आहे. ते म्हणाले, भाजपाने दर वर्षी देशात २ कोटी नोकऱ्या निर्माण करण्याचं आश्वासन दिलं होतं. ते आश्वासन भाजपावाले पूर्ण करू शकले का? उलट देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. १० वर्षे उलटली तरी हे लोक एक लाख तरुणांची भरती करू शकले नाहीत ते लोक आता पाच लाख नोकऱ्या देण्याचं आश्वासन देतायत, हे पाहून त्यांची कीव कराविशी वाटते."आम्ही अजून २० जागा जिंकल्या असत्या तर हे सगळे लोक आज तुरुंगात असते. ते लोक केवळ तुरुंगात राहण्यालायक आहेत. भारतीय जनता पार्टीचे लोक केवळ मोठमोठी भाषणं करतात, पण त्याच भाषणांमध्ये दिलेली आश्वासनं पूर्ण करणं त्यांना जमत नाही. भाषण करणं आणि कृती करणं यात खूप फरक आहे. भाजपाने कितीही प्रयत्न केले तरी कॉंग्रेस व नॅशनल कॉन्फरन्सची युती त्यांना तोडता येणार नाही. आम्ही व आमची युती कमजोर होणार नाही. संसदेत आम्ही आमची ताकद दाखवून दिली आहे. आता विधानसभेत त्यांना इंगा दाखवायची वेळ आली आहे. आमची एकजूट झाली आहे, पर्ण ताकदीनिशी आम्ही जम्मू काश्मीरच्या विधानसभेत परतू.मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले, कॉंग्रेस व नॅशनल कॉन्फरन्सची युती पाहून भारतीय जनता पार्टी घाबरली आहे. त्यामुळेच ते जम्मू-काश्मीरमधील उमेदवारांची यादी वारंवार बदलत आहेत. कोणत्या जागेवर कुठला उमेदवार उभा करावा हे त्यांना सुचेनासं झालं आहे. त्यांचा पक्ष या राज्यात कमकुवत आहे.राहुल गांधी व फारुख अब्दुल्ला एकत्र आल्याने भाजपाच्या गोटात शांतता पसरली आहे.भाजपाने जम्मू-काश्मीरमध्ये ५ लाख नोकऱ्या निर्माण करण्याचं आश्वासन दिलं होतं. खर्गे यांनी याला भाजपाची जुमलेबाजी म्हटलं आहे.

### 20 उमेदवार निवडून आले असते तर

ते म्हणाले, भाजपाने दर वर्षी देशात २ कोटी नोकऱ्या निर्माण करण्याचं आश्वासन दिलं होतं. ते आश्वासन भाजपावाले पूर्ण करू शकले का? उलट देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. १० वर्षे उलटली तरी हे लोक एक लाख तरुणांची भरती करू शकले नाहीत ते लोक आता पाच लाख नोकऱ्या देण्याचं आश्वासन देतायत, हे पाहून त्यांची कीव कराविशी वाटते. खर्गे हे सध्या जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर आहेत. दरम्यान, अनंतनाग येथे आयोजित प्रचारसभेत बोलताना भारतीय जनता पार्टीवर सडकून टीका केली. ते म्हणाले, "लोकसभेला आमच्या अजून २० जागा आल्या असत्या तर हे सगळे तुरुंगात असते (आमचे अजून २० उमेदवार निवडून आले असते तर भाजपावाले तुरुंगात असते.

# आजी-आजोबांना केंद्र सरकारचं मोठं गिफ्ट

## आता 70 वर्षांवरील सर्वांना आयुष्मान भारत विमा कवच मिळणार

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आज (११ सप्टेंबर) झालेल्या बैठकीत अनेक मोठे निर्णय घेण्यात आले. या बैठकीतील सर्वात मोठा निर्णय म्हणजे, ७० वर्षांवरील वृद्धांचा आयुष्मान योजनेत समावेश करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव याबाबत माहिती देताना म्हणाले, या निर्णयाचा देशातील ४.५ कोटी कुटुंबांमधील ६ कोटी ज्येष्ठ नागरिकांना फायदा होणार आहे.**



लाभ देण्याचं सरकारचं उद्दीष्ट आहे. या योजनेअंतर्गत सर्व पात्र लाभार्थ्यांना नवीन व स्वतंत्र आयुष्मान कार्ड दिलं जाणार आहे. अश्विनी वैष्णव म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आजच्या बैठकीत स्पष्ट केलं की ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान भारत पीएम जन आरोग्य योजनेंतर्गत संरक्षण द्यायला आपण वचनबद्ध आहोत. आयुष्मान भारत योजनेत आधीच समाविष्ट केलेल्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांचाही आता समावेश केला जाणार आहे. या ज्येष्ठांना दर वर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे अतिरिक्त टॉप-अप कव्हर मिळेल. जे ज्येष्ठ नागरिक सध्या केंद्र सरकारच्या कोणत्याही दुसऱ्या आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट असतील तर त्यांना आयुष्मान भारत योजनेत स्विच करण्यचा पर्याय असेल.

### मंत्रिमंडळ बैठकीतील महत्त्वाचे निर्णय

७० वर्षे किंवा त्याहून अधिक वय असलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती विचारात न घेता सरसकट सर्वांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे.आजच्या कॅबिनेट बैठकीत इतरही अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ई-बस पेमेंट सुरक्षा यंत्रणेची घोषणा केली. याअंतर्गत देशातील १६९ शहरांमध्ये ३८,००० इलेक्ट्रिक बसेस चालवल्या जाणार आहेत. यामुळे प्रदूषण कमी करण्यास मदत मिळेल, असं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

# गणपतीच्या 4 हातांची 4 रहस्ये!

**भगवान गणेशाला दोन हात असले तरी त्याच्या विशेष अवताराच्या वेळी त्याला चार हात असल्याचे वर्णन केले आहे. त्याच्या चार हातांच्या चार हातांमध्ये चार वस्तू आहेत. त्याच्या चार हातांपैकी एका हातात अंकुश, दुसऱ्या हातात फंदा, तिसऱ्या हातात मोदक आणि चौथ्या हातात आशीर्वाद आहे. त्याच्या चार हातांचे रहस्य काय आहे ते जाणून घेऊया.**



## 1. पहिला हात :

बाप्पाच्या पहिल्या हातातील अंकुश हे सूचित करतो, की इच्छांवर संयम ठेवणे आवश्यक आहे.

## 2. दुसरा हात :

गणेश बाप्पाच्या दुसऱ्या हातातील लूप हे या वस्तुस्थितीचे सूचक आहे की प्रत्येक व्यक्तीने आपल्या आचरणात आणि वर्तनात इतका संयम आणि नियंत्रण असणे आवश्यक आहे, जेणेकरून जीवनाचा समतोल राखला जाईल. फंदा हे नियंत्रण, संयम आणि शिक्षेचे प्रतीक आहे.

## 3. तिसरा हात :

त्याच्या तिसऱ्या हातामध्ये मोदक आहे. मोदकाचा अर्थ आनंद देणारा (सुख देणारा) जो सुख आणि समाधान देतो. शरीर आणि मन समाधानी असणे महत्वाचे आहे, तरच तुम्हाला जीवनात खरा आनंद मिळेल. समाधान कसे मिळते? किंबहुना, जसे थोडे-थोडे-थोडे मोदक खाल्ल्याने त्याची चव आणि गोडवा अधिक आनंद मिळतो आणि शेवटी मोदक खाल्ल्यावर समाधान वाटते, त्याचप्रमाणे वरवरचे आणि बाह्य ज्ञानाने माणसाला आनंद मिळत नाही. तर ज्ञान मिळते. आनंद आणि यशाचा गोडवा त्याच्या खोलात दडलेला आहे.

## 4. चौथा हात:

या हाताने तो भक्तांना आशीर्वाद देतो. जो आपल्या कर्माचे फळ भगवंताच्या हाती देतो त्याला परमेश्वर आशीर्वाद देतो. हा चौथ्या हाताचा संदेश आहे.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव जनजागृती व्हावी!

भारतासह देशविदेशात पोहोचलेला गणेशोत्सव काळानुरूप बदलत आहे. मात्र आज साजरे होणारे गणेशोत्सव हे पर्यावरणाला हानीकारक तर ठरत नाहीत ना, याकडे मात्र लक्ष देण्याची वेळ आली आहे. आज आपण पर्यावरणाविषयी अधिक सजग झालो आहोत. त्यामुळे आपले प्रत्येक सण आणि उत्सव हे पर्यावरणपूरक पध्दतीने साजरे होणे आवश्यक आहे. अगदी काही दिवसांवर येउन ठेपलेला गणेशोत्सव सुध्दा पर्यावरणपूरकच असायला हवा, कारण पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही काळाची गरज आहे. पर्यावरणाची काळजी घेऊन आपल्याला गणेशोत्सव साजरा करता येईल. भारतीय संस्कृतीमध्ये सण, उत्सव व परंपरेला महत्त्वाचे स्थान आहे. देशभरात विविध भौगोलिक प्रदेशानुसार सर्वत्र सण, उत्सव व परंपरा साजरे केले जातात. भारतीय सण, उत्सव व परंपरेला पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने ही महत्व आहे. यामाध्यमातून पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करणे हा ही संदेश दिला जातो. सणांच्या माध्यमातून पर्यावरण रक्षण हा ही प्रमुख हेतू असतो. निसर्गाला किंवा पर्यावरणाला अनुसरूनच सर्व धर्माचे सण, उत्सव व परंपरा आहेत. आजूबाजूच्या निसर्गसंपन्न वातावरणात सण साजरे केले जातात. सध्या गरज आहे सगळे सण हे निसर्गपूरक किंवा पर्यावरणपूरक कश्या पध्दतीने साजरे होतील हे पाहण्याची. त्यादृष्टीने जनजागृती होणे महत्वाचे आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा केला तर हा आनंद द्विगुणितच होईल. आनंददायी सोहळ्यासाठी पर्यावरणपूरक गणेशोत्सव कश्या पध्दतीने साजरा होईल हे पाहणे या निमित्ताने उचित ठरेल.आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा विचार करणे सुध्दा सध्या गरजेचे आहे. सध्या जागतिक तापमानवाढीमुळे निसर्गचक्र बदलत आहे. मान्सून चक्र सुद्धा बदललेली आहे. महापूर, भूस्खलन यासारख्या समस्या वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येक सण हे पर्यावरणपूरक कशा पद्धतीने साजरा करता येईल हे पाहणे सध्याच्या काळामध्ये योग्य आहे. गणेशोत्सव साजरा करीत असताना जलप्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनिप्रदूषण होणार नाही याची काळजी सर्वांनी घेणे अपेक्षित आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव कशा पद्धतीने साजरा केला पाहिजे यावर प्रत्येकाने बारकाईने लक्ष देणे आवश्यक बनलेले आहे. प्रत्येक सणानिमित्ताने घरामध्ये प्रसन्न वातावरण निर्माण होते. त्यामुळे व्यक्तीला, कुटुंबाला आणि समाजाला एक आत्मिक शांतता लाभते आणि आनंदही मिळतो. प्रसन्न वातावरणामुळे मनामध्ये एक सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. त्यामुळे देशभरात साजरे करण्यात येणाऱ्या प्रत्येक सणाला विशेष महत्त्व आहे. सध्या संपूर्ण देशात गणेशोत्सवाचे मंगलमय वातावरण आहे. ढोल-ताशांच्या गजरामध्ये श्री गजाननाचे आगमन झालेले आहे. गौरीच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे. गणेशोत्सव म्हणजे आनंद, उत्साह, ऊर्जा, मराठी अस्मिता व परंपरा आणी भारतीय संस्कृतीचे प्रतीक असा सण आहे. सण साजरे करताना उत्सवातून प्रदूषण होणार नाही याची खबरदारी प्रत्येकाने घ्यायला हवी. सध्या सर्वत्र पर्यावरण ऱ्हासमुळे विविध प्रकारच्या समस्यांचा डोंगर उभा आहे. हवा, पाणी, ध्वनी आणि जमिनीचे प्रदूषण वाढतच आहे. त्यामुळे वाढत्या प्रदूषणामध्ये आणखी भर नको. म्हणून इथून पुढच्या काळामध्ये प्रत्येक सण, उत्सव व परंपरा साजरे करताना पर्यावरण रक्षणांचा विचार करायला हवा. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आपण काय करू शकतो व आपण स्वतः पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करण्यासाठी काय मदत करू शकतो. हेही प्रत्येकाने पाहिले पाहिजे. ध्वनी प्रदूषण, हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण कमी करण्यास हातभार लावू शकतो. गणेशोत्सव काळामध्ये मोठ्या प्रमाणात स्पीकर लावले जातात त्यामुळे ध्वनी प्रदूषण होते. त्यामुळे कमी आवाजात स्पिकर लावणे गरजेचे आहे. आतषबाजीमुळे फटाक्यातून हवा प्रदूषण होते. त्यामुळे फटाकेमुक्त गणेशोत्सव साजरा करणे गरजेचे आहे. गणपतीचे विसर्जन करताना नदीमध्ये किंवा तलावांमध्ये न करता मूर्तीदान करून पर्यावरण रक्षणासाठी मदत करू शकतो. गणेशोत्सवासाठी जंगलातील विविध प्रकारची पाने, फुले, फळे व वनस्पती यांचा वापर पूजा व सजावट करण्यासाठी केला जातो. त्यामुळे निसर्गातील दुर्मिळ वनस्पती नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो. म्हणून गणेशोत्सवात शेतामध्ये किंवा परस बागेमध्ये पिकवल्या जाणाऱ्या बागयती फुलांचा व फळांचा वापर करुन पर्यावरणपूरक सण साजरा करण्यास हातभार लावणे गरजेचे आहे.



# गिल अवनीत कौरला करतोय डेट?

## अवनीतने शुबमनच्या वाढदिवसानिमित्त शेअर केली स्टोरी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेटपटू शुबमन गिल अनेकदा त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असतो. आतापर्यंत त्याचे नाव अनेक बॉलीवूड सुंदरींसोबत जोडले गेले आहे, तर सारा तेंडुलकरसोबतही त्याच्या डेटिंगच्या बातम्या येत आहेत. पण, आता या क्रिकेटरने २५ वा वाढदिवस साजरा केल्यानंतर तो २२ वर्षीय अभिनेत्रीला डेट करत असल्याचं बोललं जात आहे. या दोघांचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत असून याआधीही ते अनेक कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसले आहेत. कोण आहे ती अभिनेत्री जाणून घेऊया.**



### ऑस्ट्रेलियात दोघेही एकत्र दिसले

डान्स के सुपरस्टार या आणखी एका डान्स शोमध्येही ती सहभागी झाली होती. तिचे इन्स्टाग्रामवर ३२ दशलक्ष फॉलोअर्स आहेत आणि ती तिच्या सौंदर्याने आणि हॉटनेसने लाखो हृदयांवर राज्य करते. शुबमन गिल आणि अवनीत कौर याआधीही अनेकदा एकमेकांसोबत दिसले आहेत. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये काही फोटो व्हायरल झाले होते ज्यात दोघेही ऑस्ट्रेलियात एकत्र दिसले होते.भारतीय क्रिकेटपटू शुबमन गिल अनेकदा त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असतो. आतापर्यंत त्याचे नाव अनेक बॉलीवूड सुंदरींसोबत जोडले गेले आहे.

खरंतर, शुबमनच्या वाढदिवसाला अवनीत कौरने त्याच्यासोबतचा फोटो शेअर करून एक स्टोरी पोस्ट केली होती. तेव्हापासून दोघेही एकत्र असल्याच्या चर्चांना वेग आला आहे. अवनीत दररोज इन्स्टाग्रामवर तिचे किलर फोटो शेअर करून लोकांचे लक्ष वेधून घेत आहे. मात्र, या सर्वात जास्त तिचा शुबमन गिलबरोबरचा फोटो व्हायरल होत आहे. अशा परिस्थितीत अवनीतच्या त्या लूकवर एक नजर टाकूया, ज्यांच्या तुलनेत बॉलिवूडच्या सौंदर्यवतीही फिक्या पडतात.शुबमन गिलने ८ सप्टेंबर रोजी वाढदिवस साजरा केला. या खास प्रसंगी अवनीत कौरने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शुबमनसोबतचा एक फोटो शेअर केला होताा. अवनीतने या फोटोसोबत लिहिले होते की, “शुबमन, वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा. तू लोकांना अशीच प्रेरणा देत राहा. मला तुझा खूप अभिमान आहे.” या पोस्टने सोशल मीडियावर पटकन लोकप्रियता मिळवली आणि फोटो व्हायरल झाला.विशेष म्हणजे याआधी अवनीत आणि शुबमन लंडनमध्ये एकत्र दिसले होते, त्यानंतर त्यांच्या रिलेशनबाबत बातम्या सुरू झाल्या होत्या. मात्र, त्यावेळी या बातम्यांना फारसे महत्त्व मिळाले नाही. आता, शुबमनच्या वाढदिवसानिमित्त अवनीतच्या पोस्टने या अफवांना पुन्हा एकदा खतपाणी घातले आहे. शुबमन गिल आणि अवनीत कौर याआधीही अनेकदा एकमेकांसोबत दिसले आहेत. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये काही फोटो व्हायरल झाले होते ज्यात दोघेही ऑस्ट्रेलियात एकत्र दिसले होते. या पोस्टनंतर सोशल मीडियावर चाहत्यांनी शोध सुरू केला की अवनीत कौर कोण आहे? अवनीत कौर ही एक भारतीय टेलिव्हिजन आणि चित्रपट अभिनेत्री आहे. तिने आपल्या करिअरची सुरुवात डान्स इंडिया डान्स लिटलमास्टर्समधून स्पर्धक म्हणून केली होती. डान्स के सुपरस्टार या आणखी एका डान्स शोमध्येही ती सहभागी झाली होती. तिचे इन्स्टाग्रामवर ३२ दशलक्ष फॉलोअर्स आहेत आणि ती तिच्या सौंदर्याने आणि हॉटनेसने लाखो हृदयांवर राज्य करते. शुबमन गिल आणि अवनीत कौर याआधीही अनेकदा एकमेकांसोबत दिसले आहेत. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये काही फोटो व्हायरल झाले होते ज्यात दोघेही ऑस्ट्रेलियात एकत्र दिसले होते.खरंतर, ८ सप्टेंबरला शुबमनच्या वाढदिवसाला अवनीत कौरने त्याच्यासोबतचा फोटो शेअर करून एक स्टोरी पोस्ट केली होती. तेव्हापासून दोघेही एकत्र असल्याच्या चर्चांना वेग आला आहे. अवनीत दररोज इन्स्टाग्रामवर तिचे किलर फोटो शेअर करून लोकांचे लक्ष वेधून घेत आहे. मात्र, या सर्वात जास्त तिचा शुबमन गिलबरोबरचा फोटो व्हायरल होत आहे. अशा परिस्थितीत अवनीतच्या त्या लूकवर एक नजर टाकूया, ज्यांच्या तुलनेत बॉलिवूडच्या सौंदर्यवतीही फिक्या पडतात.शुबमन गिलने ८ सप्टेंबर रोजी वाढदिवस साजरा केला. या खास प्रसंगी अवनीत कौरने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शुबमनसोबतचा एक फोटो शेअर केला होताा. अवनीतने या फोटोसोबत लिहिले होते की, “शुबमन, वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा. तू लोकांना अशीच प्रेरणा देत राहा. मला तुझा खूप अभिमान आहे.” या पोस्टने सोशल मीडियावर पटकन लोकप्रियता मिळवली आणि फोटो व्हायरल झाला.विशेष म्हणजे याआधी अवनीत आणि शुबमन लंडनमध्ये एकत्र दिसले होते, त्यानंतर त्यांच्या रिलेशनबाबत बातम्या सुरू झाल्या होत्या. मात्र, त्यावेळी या बातम्यांना फारसे महत्त्व मिळाले नाही. आता, शुबमनच्या वाढदिवसानिमित्त अवनीतच्या पोस्टने या अफवांना पुन्हा एकदा खतपाणी घातले आहे. शुबमन गिल आणि अवनीत कौर याआधीही अनेकदा एकमेकांसोबत दिसले आहेत. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये काही फोटो व्हायरल झाले होते ज्यात दोघेही ऑस्ट्रेलियात एकत्र दिसले होते. या पोस्टनंतर सोशल मीडियावर चाहत्यांनी शोध सुरू केला की अवनीत कौर कोण आहे? अवनीत कौर ही एक भारतीय टेलिव्हिजन आणि चित्रपट अभिनेत्री आहे. तिने आपल्या करिअरची सुरुवात डान्स इंडिया डान्स लिटलमास्टर्समधून स्पर्धक म्हणून केली होती.

# ‘मी मीडियम पेसर नाही, फास्ट बॉलर’

## मुंबई इंडियन्सच्या पोस्टने बुमराह भडकला, VIDEO व्हायरल

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जसप्रीत बुमराहला सध्याच्या घडीला जगातील महान क्रिकेटपटू म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. फॉरमॅट कोणताही असो, प्रत्येक फलंदाज बुमराहचा सामना करायला कचरतो. जसप्रीत बुमराहने २०२४ च्या टी-२० विश्वचषक ४.१७ च्या इकॉनॉमीने धावा दिल्या होता.**




### 2016 मध्ये भारतासाठी केले पदार्पण

यावेळी बुमराहला रनअपमध्ये त्रास होत होता. यानंतर रनअपच्या ठिकाणी वाळू ओतली गेली आणि पुढच्याच चेंडूवर त्याने विराट कोहलीला एलबीडब्ल्यू करून पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.२०१६ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात जसप्रीत बुमराहला भारताकडून पदार्पण करण्याची संधी मिळाली. आतापर्यंत त्याने भारतासाठी ३६ कसोटी, ८९ एकदिवसीय आणि ७० टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.

वास्तविक आजच्या काळात बड्या गोलंदाजांची वनडे इकॉनॉमीने यापेक्षा वाईट असते. जसप्रीत बुमराहाचा सामना करताना फलंदाज नेहमी धावा करण्यापेक्षा फलंदाज अधिक विकेट वाचवण्याचा प्रयत्न करतात. आता बुमराहचा मुंबई इंडियन्सवर रागावल्याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. जसप्रीत बुमराहने २०१३ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. त्यावेळी त्यांचे वय १९ वर्षे होते. तो मुंबईच्या स्काऊट टीमचा शोध आहे. जसप्रीत बुमराह सुरुवातीपासूनच त्याचा अनोख्या बॉलिंग ॲक्शनमुळे प्रसिद्धीच्या झोतात आला होता. आता मुंबई इंडियन्सने असाच एक व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये बुमराहच्या नावासमोर उजव्या हाताचा मीडियम पेसर असे लिहिले होते. ज्यामुळे तो खूश दिसत नाही. त्यामुळे पुढे व्हिडीओमध्ये बुमराह म्हणतोय, पण हे चुकीचे आहे, नाही का? मी मीडियम पेसर नाही, फास्ट बॉलर आहे.जसप्रीत बुमराहने आयपीएल २०१३ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध पदार्पण केले होते. त्याच्यासमोर जागतिक क्रिकेटमध्ये आपला दबदबा निर्माण करणारा विराट कोहली होता. विराटने बुमराहला पहिल्या चार चेंडूत तीन चौकार ठोकले.